## १५ वा वित्त आयोग आरोग्य विभाग जिल्हा परिषद, वाशिम

## कंत्राटी वैद्यकिय अधिकारी पदभरती फेरजाहीरात२०२४-२५ व

## Staff Nurse, MPW, Entomologist, Public Health Specialist, Lab Technician या पदांच्या पदभरतीची उमेदवारांकरीता सुचना

१५ वा वित्त आयोग आरोग्य विभाग जिल्हा परीषद, वाशिम अंतर्गत **वैद्यकिय अधिकारी नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र** हे रिक्त कंत्राटी पद भरावयाचे असल्याने दि. ३१/०१/२०२४ प्रदर्शित करण्यात आलेल्या जाहीरातीनुसार दि. ३१/०१/२०२४ ते ०९/०२/२०२४ या कालावधीत वैद्यकिय अधिकारी या पदाकरीता एम.बी.बी.एस व बी.ए.एम.एस शिक्षण घेतलेल्या उमेदवारांमार्फत अर्ज प्राप्त झाले होते. त्यानुसार वैद्यकिय अधिकारी या पदाकरीता एम.बी.बी.एस शिक्षण घेतलेल्या २ उमेदवारांची प्रथम प्राधान्याने निवड करुन नियुक्ती आदेश देण्यात आले.

मा.सहसंचालक (तांत्रिक) राआअ मुंबई यांचे पत्र जाक्र/राआसो/15thFC/BAMSMO/१०७७३२-१०८१३५/२३ दिनांक ०७/१२/२०२३ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार वैद्यकिय अधिकारी या पदाकरीता एम.बी.बी.एस. पदवी धारक उमेदवारास प्राधान्य देण्या बाबत सुचित केल्या नुसार व अनेक वेळा प्रयत्न केल्यानंतरही एमबीबीएस पदवी धारक उमेदवार न मिळाल्यास बी.ए.एम.एस. पदवीधारक उमेदवाराच्या निवडीचे प्राधान्य देण्याबाबत नमुद केले आहे.

त्यानुसार वैद्यकिय अधिकारी या पदाकरीता एम.बी.बी.एस ची शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्याच्या अनुषंगाने एम.बी.बी.एस ची शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांमार्फत व बी.ए.एम.एस. शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांमार्फत पुनःश्च अर्ज मागविण्याकरीता सदर फेर जाहीरात देण्यात येत असुन त्या अनुषंगाने वैद्यकिय अधिकारी या पदाकरीता एम.बी.बी.एस व बी.ए.एम.एस. पदवीचे शिक्षण घेतलेल्या इच्छुक उमेदवारांनी जिल्हा परीषदेच्या अधिकृत संकेत स्थळावर (www.zpwashim.com) जाहीरात बघुन दि.०३/०२/२०२५ ते १४/०२/२०२५ रोजी पर्यंत दिलेल्या कालावधीत विहीत नमुन्यामध्ये आवश्यक शुल्का सह अर्ज राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, आरोग्य विभाग जिल्हा परिषद वाशिम येथे सकाळी ११ ते सायंकाळी ५.०० पर्यंत मुळ कागदपत्रासह सादर करावा. तसेच Staff Nurse, MPW, Entomologist, Public Health Specialist, Lab Technician या रिक्त पदांकरीताही इच्छुक उमेदवारांनी जिल्हा परीषदेच्या अधिकृत संकेत स्थळावर (www.zpwashim.com) जाहीरात बघुन दि. ०३/०२/२०२५ ते १४/०२/२०२५ रोजी पर्यंत दिलेल्या कालावधीत विहीत नमुन्यामध्ये आवश्यक शुल्का सह अर्ज राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, आरोग्य विभाग जिल्हा परिषद वाशिम येथे सकाळी ११ ते सायंकाळी ५.०० पर्यंत मुळ कागदपत्रासह सादर करावा. दिनांक १४/०२/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी

टिप :- एम.बी.बी.एस उमेदवार उपलब्ध न झाल्यास बी.ए.एम.एस. पात्रता धारक उमेदवारांना विचार केला जाईल त्यामुळे एम.बी.बी.एस उमेदवार उपलब्ध न झाल्यास यापुर्वीच्या जाहिरात क्र.१ दि. ३१/०१/२०२४ नुसार अर्ज केलेल्या बी.ए.एम.एस शैक्षणिक पात्रता धारक उमेदवारांचे अर्ज देखील ग्राहय धरल्या जातील. त्यामुळे उक्त जाहीरातीनुसार अर्ज केलेल्या बी.ए.एम.एस पात्रता धारक उमेदवारांना अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

| | | |
|---|---|---|
| -स्वा- | -स्वा- | -स्वा- |
| जिल्हा लेखा व्यवस्थापक<br>राआअ आरोग्य विभाग<br>जिल्हा परिषद वाशिम | सदस्य सचिव निवड समिती तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद, वाशिम | अध्यक्ष निवड समिती तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद, वाशिम |

१५ वा वित्त आयोग जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत सन २०२४–२५ च्या कृती आराखडया नुसार खालील दर्शविलेल्या ठिकाणी रिक्त पदे आहेत. सदर रिक्त पदाकरिता पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**Urban Health & Wellness Center (UHWC)**

| Sr. No | Name of Post | Place of UHWC Posting | Qualification | Vacant Post | Caste Category | Experience | Remuneration (Per Month Consolidated) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | Medical Officer | 1) Jijau Nagar, Risod<br>2) Bagvanpura, Washim<br>3) Vinayak Nagar, washim<br>4) Gawalipura, Mangrulpir<br>5) Gautam Nagar, Karanja<br>6) Salipura, Karanja<br>7) Wanipura/Bharati pura Karanja<br>8) Sindhi camp, karanja<br>9) vasant nagar, Manora | MBBS/BAMS | 09 | SC-1<br>ST-1<br>(VJ-A/NT-C)-1<br>(NT-B/NT-D/SBC)-1<br>OBC-1<br>SEBC-2<br>EWS-2 | Govt / Pvt | FOR MBBS Rs. 60000/-<br>FOR BAMS 25000/- +15000/- PBI |
| 2 | Staff Nurse | 1) Jijau Nagar, Risod<br>2) Allada Plot, Washim<br>3) Vinayak Nagar, washim<br>4) Gawalipura, Mangrulpir<br>5) Gautam Nagar, Karanja<br>6) Salipura, Karanja<br>7) Wanipura/Bharati pura Karanja<br>8) Sindhi camp, karanja<br>9) Kale File Washim<br>10) Chandika vesh Washim<br>11) AshokNagar Mangrulpir<br>12) Kumbhar pura Karanja<br>13) vasant nagar, Manora | GNM/Bsc Nursing | 13 | SC-1<br>(VJ-A/NT-C)-1<br>(NT-B/NT-D/SBC)-1<br>OBC-3<br>SEBC-2<br>EWS-2<br>OPEN-3 | Govt | 20000/- |
| 3 | MPW | 1) Jijau Nagar, Risod<br>2) Allada Plot, Washim<br>3) Vinayak Nagar, washim<br>4) Gawalipura, Mangrulpir<br>5) Gautam Nagar, Karanja<br>6) Wanipura/Bharati pura Karanja<br>7) Sindhi camp, karanja<br>8) Chandika vesh Washim<br>9) AshokNagar Mangrulpir<br>10) Kumbhar pura Karanja<br>11) vasant nagar, Manora<br>12) Akola Fata Malegaon | 12th Pass in Science+ Paramedical Basic Training Course OR Sanitary Inspector Course | 12 | SC-2<br>ST-1<br>(VJ-A/NT-C)-1<br>(NT-B/NT-D/SBC)-1<br>SEBC-2<br>EWS-2<br>OPEN-3 | Govt | 18000/- |

**Block Public Health Unit (BPHU)**

| Sr. No. | Name of Post | Place of Posting | Qualification | Vacant Post | Caste Category | Experience | Remuneration (Per Month Consolidated) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Entomologist | 1) BPHUWashim-1<br>2) BPHU Manora-1 | Msc Zoology with 5 Years Experience | 2 | (VJA/NT-B/NT-C/NT-D/SBC)-1<br>(SEBC/EWS)-1 | Govt | 40000/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | Public Health Specialist | 1) BPHUWashim-1<br>2) BPHU Malegaon-1<br>3) BPHU Karanja-1<br>4) BPHU Manora-1 | Any Medical Graduate With MPH/MHA /MBA in Health | 4 | (SC/ST)-1<br>(VJA/NT-B/NT-C/NT-D/SBC)-1<br>OBC-1<br>(SEBC/EWS)-1 | Govt | 35000/- |
| 3 | Lab Technician | 1) BPHUWashim-2<br>2) BPHU Malegaon-1<br>3) BPHU Mangrulpir-1<br>4) BPHU Karanja-1<br>5) BPHU Risod-1<br>6) BPHU Manora-2 | 12th Science+DMLT (Paramedical Council Registratio Certificate Compolsory) | 8 | SC-2<br>ST-1<br>(VJ-A/NT-C)-1<br>(NT-B/NT-D/SBC)-1<br>OBC-1<br>SEBC-1<br>EWS-1 | Govt | 17000/- |

वरील प्रमाणे मंजुर पद हे निव्वळ कत्रांटी पध्दतीचे असुन सदर रिक्त पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी ईच्छूक उमेदवारांनी आपले अर्ज व प्रमाणपत्राच्या मुळ प्रति व छायांकित केलेल्या साक्षंकित प्रतीसह उपरोक्त नमुद केलेल्या मंजुर पदासाठी अर्ज स्विकारण्याची मुदत दि. ०३/०२/२०२५ पासुन ते दिंनाक १४/०२/२०२५ रोजी पर्यंत दिलेल्या कालावधीत विहीत नमुन्यामध्ये आवश्यक शुल्का सह अर्ज राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, आरोग्य विभाग जिल्हा परिषद वाशिम येथे सकाळी ११ ते सायंकाळी ५.०० पर्यंत मुळ कागदपत्रासह सादर करावा. Medical officer, Staff Nurse, MPW, Entomologist, Public Health Specialist, Lab Technician या पदाकरीता अर्ज स्विकारण्यात येतील.

तसेच दिनांक १४/०२/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० नंतर आलेल्या उमेदवारांच्या अर्जाचा भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. **ई.मेलद्वारे व पोस्ट ऑफीस व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.**

**अटी व शर्ती :-**

**१) मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई याचं पत्र क्र.जा.क्र. राआसो/मनुष्यबळ/वयोमर्यादा-शुध्दीपत्रक/१४८१८-१५१८१/१९ दिनांक २८/०५/२०१९ च्या पत्रन्वये वैद्यकिय अधिकारी एम.बी.बी.एस, विशेतज्ञ, आणि अतिविशेष्ठ विशेतज्ञ यांची वयोमर्यादा ७० वर्ष करण्यात आली असुन त्या करीता वय वर्ष ६० पेक्षा जास्त असलेल्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडुन शारीरीक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुनच अर्ज करावे.**

२) वैद्यकिय अधिकारी वगळता इतर पदांकरीता सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णय अनुसरुन अर्ज करण्याच्या अर्ज स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे वय २१ वर्षे पेक्षा कमी नसावे व कमाल वयोमर्यादा पेक्षा जास्त नसावे. (खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागास प्रवर्गासाठी ४३ वर्षे) राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरीता ५ वर्षापर्यंत शिथिलता करण्यात येईल. अर्जदार हा शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

३) उपरोक्त पदांकरिता ईच्छुक उमेदवारानी अर्जा सोबत **“District Integrated Health & family Welfare Society, Washim”.** या नावे देय असलेला खुल्या प्रवर्गासाठी रु.२००/- व मागासवर्गीया साठी रु १००/- चा (ना परतावा) धनाकर्ष (Demand Draft (D.D.) ) सदर अर्जासोबत जोडणेबंधन कारक आहे .

४) जाहीरातीतील पदे ही राज्य शासनाची नियमीतची पदे नसुन सदरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचे हक्क राहणार नाही. तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु राहणार नाहीत. तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

५) उपरोक्त पद हे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती २९ जुन २०२५ पर्यंत असेल. सदर कंत्राटी पदांकरिता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल. तसेच पुढील पुर्ननियुक्ती (११ महिने २९ दिवस या कालावधीकरिता) आपल्या कामगिरी मुल्यांकनावर व तसेच राज्यस्तरावरुण सदर पदाकरीताचा पुढील वर्षाच्या मान्यतेवर आधारीत असेल.

६) जाहीरातीत नमुद वय अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यत ग्राहय धरले जाईल तसेच शैक्षणिक अर्हता,अनुभव व नोंदणी प्रमाणपत्र अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यत ग्राहय धरले जाईल.

७) सविस्तर जाहीरात, पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, निवड/प्रतिक्षा यादी व पदभरती प्रक्रियेबाबची सर्व माहीती/सुचना जिल्हा परिषद वाशिम जिल्हयाच्या **www.zpwashim.com** या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल याबाबत अर्जदारास कुठलाही स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही.

८) **राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या ठिकानी भरतीची आवश्यकता लक्षात घेऊन व १५ वा वित्त आयोग हे कालमर्यादेत राबविण्याचे आयोग आहे ही बाब लक्षात घेऊन प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना त्या प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.**

९) सदर पदाकरिता प्रतिक्षा यादी ही पुढिल १२ महिण्याकरिता मंजुर राहील तसेच भरतीची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर भविष्यात जर एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिल्यामुळे जागा रिक्त झाल्यास नविन भरती प्रक्रिया न करता प्रतिक्षा यादीतील उमेदवारास नियुक्ती आदेश दिले जातील.

१०) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्या व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

११) केंद्र/ राज्य शासनाने संबधित पदे मंजुर न केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल व याबाबत कुठलीही तक्रार व गाऱ्हाणी ऐकुण घेण्यात येणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना निवड यादीतील गुणानुक्रमांकाच्या आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. याबाबत उमेदवारांना कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

१२) निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.५००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल. तसेच नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांचा नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.

१३) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचुक नोंदवावा. तसेच ते भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मोबाईल नंबर व ई-मेल आयडी कार्यरत राहील याची दक्षता घ्यावी. सदर पदांकरिता अर्ज करणारा उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.

१४) राखीव संवर्गातुन अर्ज करण्याऱ्या उमेदवारांना त्या संवर्गाचे जात प्रमाणपत्र(Cast certificate) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. जात प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही व अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही. मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज आरक्षणामधुन सादर केला आसल्यास त्याबाबत चे कागद पत्र सोबत जोडण्यात यावे अन्यथा, उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही. EWS प्रवर्गामध्ये अर्ज करण्याऱ्या उमेदवारानी EWS( Economically Weaker Section ) चे सदर कालावधी करीताचे Valid प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे. अन्यथा आपला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

१५) जाहिराती मध्ये नमुद पदांना तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशनचे नुतनीकरण प्रमाणपत्र/कौन्सिलचे रजिस्ट्रेशनासाठी अर्ज सादर केल्याबाबतची पावती अर्जासोबत अपलोड करणे बंधनकारक राहील तसेच कौन्सीलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालु कालावधीतील असावी. तथापी अवैद्य प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना भरतीप्रक्रीयेतुन अपात्र ठरविले जाईल.

१६) अर्ज सादरीकरण करणे किंवा मुलाखती करीता उपस्थित उमेदवारांना भत्ता व इतर भत्ता देय राहणार नाही.

१७) दोनपेक्षा अधिक हयात मुले असणाऱ्या उमेदवारांना सदर पदाकरीता जिल्हा परिषद वाशिम कंत्राटी पदावर निवड करण्यात येणार नाही. या करिता लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र अर्जा सोबत दिलेल्या नमुन्यानुसार सादर करावे.

१८) जाहीरातीमधील पदांच्या संख्येत तसेच सामाजिक आरक्षणामध्ये कमी-जास्त बदल व पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. अटी व शर्तीमध्ये बदल करणे व पदभरती स्थगित करणे / रद्द करणे यांबाबतचे सर्व अधिकार हे कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोनत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम, यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहे.

१९) ज्या उमेदवारांना ग्रेड सिस्टीम CGPA/SGPA नुसार गुण मिळालेले आहेत त्यांनी अंतिम वर्षाच्या गुणांची टक्केवारी तसेच त्यांच्या विद्यापिठानुसार टक्केवारी काढण्याचे सुत्र अर्जामध्ये नमूद करावेत.सदर माहिती न दिल्यास गुण दिले जाणार नाहीत.

२०) अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेल्या गुणांची टक्केवारी अचूकपणे नमुद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमुद न करता गुणांची टक्केवारी नमुद करणे आवश्यक आहे. अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधित संस्थेकडुन त्याचे गुणांमध्ये रुपांतर करुन ते प्रमाणित करुन घ्यावे व त्याची स्वसाक्षांकित प्रत सादर करावी. तत्सम स्वरुपात कागदपत्र सादर न केल्यास त्यास गुण देय राहणार नाही व त्या करिता निवड समिती जबाबदार राहनार नाही यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२१) सदर भरती प्रक्रियेमध्ये कोणताही आक्षेप असल्यास यांचे निवारण करण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद वाशिम,यांना राहतील.

२२) अर्जदाराला कंत्राटी कालावधीमध्ये सोयीनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

२३) **रिक्त पदासाठी आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास इतर उमेदवारास गुणानुक्रमे (Against Reservation) तात्पुरत्या स्वरुपात मुळ संवर्गाचा उमेदवार उपलब्ध होईपर्यत किंवा ११ महिण्यापेक्षा जे कमी असेल त्या कालावधीकरिता नियमानुसार नियुक्ती दिली जाईल.तथापी कमाल ३८ वयोमर्यादा सर्वसाधारण पदानुसार लागु राहील.**

**२४) तसेच वैद्यकिय अधिकारी पदाकरीता एमबीबीएस शैक्षनिक पात्रता असणाऱ्या उमेदवारास प्रथम प्राधाण्या देण्यात येईल एमबीबीएस शिक्षण असलेल्या उमेदवार न मिळाल्यास बिएएमएस शिक्षण असलेल्या उमेदवारास तात्पुरत्यास्वरुपात (जो पर्यंत एमबीबीएस उमेदवार मिळत नाही तो पर्यंत) निवड केली जाईल व त्यांना रु. २५०००/- मानधन व १५०००/-(PBI) कामावर आधारित मोबदला अदाकरण्यात येईल**

२५) उपरोक्त पदांकरिता निवड प्रकिया ही अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची छाननी करुन खालील प्रपत्रा प्रमाने गुण देवून निवड करण्यात येईल. निवड समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहील. नियुक्ती आदेश देण्यापुर्वी अर्जा सोबत जोडलेल्या कागदपत्राची सर्व मुळ (Original) कागदपत्र निवड समिती मार्फत पडताळणी केली जाईल जर सादर करण्यात आलेली कागदपत्रे चुकीची आढळल्यास उमेदवारांना निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

२६) वैद्यकिय अधिकारी या पदाकरिता खालील प्रमाणे गुणांकन पध्दतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबविण्यात येईल. अंतिम वर्षामध्ये मिळालेल्या गुणांचे ५०% गुण ग्राहय केल्या जातील व मुलाखती मध्ये खालील प्रमाणे गुणा दिल्या जातील.

A) Subject Knowledge 10 Marks
B) Research & Academic Knowledge 10 Marks
C) Leadership Quality 10 Marks
D) Administrative Abilities 10 Marks
E) Experience 10 Marks (i) Govt Experience 2Marks for 1 Year (ii)Private Experience 1 Marks for 1 Year

२७) वैद्यकिय अधिकारी पद वगळता इतर पदांकरीता खालील गुणांकन पध्दतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबविण्यात येईल.

| अ.क्र | विवरण | तपशिल | अधिकतम गुण |
|---|---|---|---|
| १. | पदासाठी आवश्यक Qualifying Exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे proportion काढावे (उदा.६०% गुण प्राप्तअसल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proportion = 60X50/100 = 30 | ५० गुण |
| २. | पदासाठी आवश्यक शैक्षणिक अहर्ते पेक्षा अधिक शैक्षणिक अहर्ता असल्यास (संबधित विषयामध्ये अधिक शैक्षणिक अहर्ता असल्यास विचारात घेण्यात येईल. | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Proportion काढावे. (उदा.१. Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पुर्णकरुन अतिरिक्त B.SC (Nursing) हि शैक्षणिक अर्हता पुर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.SC (Nursing ) च्या अंतिम वर्षात ६० % गुण प्राप्त असल्यास त्याचे २०प्रमाणे Proportion + 60*20/100 = 12 गुण ) | २० गुण |
| ३. | संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत. (जास्तीत जास्त ३० गुण) फक्त शासकीय संस्था विभाग,शासन अंगीकृत संस्था यांचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल. | ३० गुण |
| | | **एकुण गुण** | **१००** |

२८) निवड प्रक्रिया एकुण १०० गुणांची राहिल.

२९) एकुण पदांच्या ५०% प्रतिक्षा यादी ठेवण्यात यईल.

**३०) उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाशी निगडीत असलेल्या शासकीय, निमशासकीय,राष्ट्रीय आरोग्य अभियान तसेच**

खाजगी स्वरुपाच्या अनुभवाचा विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.(टिप :- खाजगी स्वरुपाचा अनुभव हा वैद्यकिय अधिकारी या पदाकरीताच लागु असेल तसेच खाजगी स्वरुपाच्या अनुभवास शासकीय, निमशासकीय,राष्ट्रीय आरोग्य अभियान तुलनेत ५०% गुण देण्यात येतील तसेच खाजगी स्वरुपाचा अनुभव ग्रहण केलेल्या संस्थेमधुन उमेदवाराने सदर अनुभव काळात बँक खात्यामध्ये मानधन प्राप्त केल्याच्या पुरावा सोबत जोडावा लागेल)

३१) **स्टाफ नर्स व लॅब टेक्निशिअन या पदांकरीता कौशल्य चाचणी अनिवार्य करण्यात आलेली आहे. या पदांकरीता पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यापुर्वी जिल्हास्तरावर कौशल्य चाचणी घेण्यात येईल व कौशल्य चाचणी अंतर्गत पात्र झाल्यास गुणांकना नुसार नियुक्ती आदेश देण्यात येईल.**

३२) स्टाफ नर्स व लॅब टेक्निशिअन हि पदे वगळता इतर पदांची गुणानुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येईल त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येईल.

३३) वरील पध्दतीनुसार नियुक्ती आदेश दिलेल्या उमेदवारांना रुजु करुन घेण्यापुर्वी सर्व आवश्यक मुळ प्रमाणपत्रे, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे आणि इतर आवश्यक कागदपत्रे यांची तपासणी व खात्री करण्याची जबाबदारी सबंधित अधिकारी यांची राहील.

३४) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना सदर पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास त्या कर्मच्याऱ्यांनी आपल्या कार्यालय प्रमुखाची पुर्वपरवानगी घेणे अवश्यक राहील व तसे परवाानगी पत्र सदर अर्जा सोबत अपलोड करणे बंधनकारक राहील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३५) Non Functional UHWC करीता निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना UHWC कार्यान्वयीत करण्यात आल्या नंतर नियुक्ती आदेश देण्यात येतील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| **-स्वा-** | **-स्वा-** | **-स्वा-** |
| **जिल्हा लेखा व्यवस्थापक** | **सदस्य सचिव निवड समिती तथा** | **अध्यक्ष निवड समिती तथा** |
| **राआअ आरोग्य विभाग** | **जिल्हा आरोग्य अधिकारी** | **मुख्य कार्यकारी अधिकारी** |
| **जिल्हा परिषद वाशिम** | **जिल्हा परिषद, वाशिम** | **जिल्हा परिषद, वाशिम** |

१५ वा वित्त आयोग आरोग्य विभाग जि.प., वाशिम

# अर्जाचा नमुना

——————————— या पदासाठी अर्ज

प्रती,
मा.सचिव निवड समिती तथा,
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, वाशिम.

१) संपूर्ण नांवः————————————————

२) वडिलांचे/पतीचेनांव :————————————————

३) आईचे नांवः————————————————

४) पत्र व्यवहाराचा पत्ता :————————————————

(पिनकोड सहित)————————————————

५) दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांकः ——————ईमेल आयडी——————

६) जन्मतारीख : / / दि. / /२०२५ रोजीचे वय —— वर्षे——महिने——दिवस

७) कोणत्या प्रवर्गासाठी अर्ज केलेला आहेत याप्रमाणे चौकटीमध्ये ✓अशी खुनकरावी.

| अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | सा.सै.मा.व | आर्थिक मागास प्रवर्ग | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJA | NTB | NTC | NTD | SBC | OBC | SEBC | EWS | Open |
| | | | | | | | | | | |

८) शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ/मंडळाचेनांव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

९) **अनुभव**

| संस्थेचे नांव व पत्ता | कालावधी | | एकूण वर्ष |
|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

१०) ऑनलाईन फी भरल्याचे क्र :- ..........................................................................

११) आपणा विरुध्द न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे काय असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा

______________________________________________

______________________________________________

१२) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडल्या आहेत.

१)
२)
३)
४)
५)
६)

१३) अर्जदार महाराष्ट्राचा रहीवासी आहे काय ? होय / नाही

मी असे प्रमाणीत करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रदद करण्यात येईल व माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

दिनांक :

ठिकाण : स्वाक्षरी______________________

नांव______________________

# प्रतिज्ञापन

## नमुना अ

मी श्री./श्रीमती/कुमारी ..................................................................

श्री...........................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय....... वर्ष, राहणार,...............................................................

याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी ............................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ..............(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

(३) दिनाक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

सही/-

दिनांक:-

d:\admin\deepak sangle\contractual staff\paripatrak.docx